जा. क्र. शिक्षण/सकाम/शिक्षक-कर्मचारी/मान्यता/
प्र. १०८/९७-९८/का. ५/ ८९५
समाजकल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे १.
दिनांक : ९.१०.९७

प्रति,
प्राचार्य,
सरदार पटेल महाविद्यालय,
समाज कार्य विभाग,
चंद्रपूर.

विषय : समाज कार्य विभागाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पद व नियुक्त्या मान्यतेबाबत

संदर्भ : जिल्हा समाजकल्याण अधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र. जिसक/अपंगविभाग/सकामवि/६३६, दि. ५ जुलै, १९९७

महोदय,

सरदार पटेल महाविद्यालय समाज कार्य विभाग, चंद्रपूर या महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पद मंजूर व नियुक्त्या मंजूरीच्या प्रस्तावावर सर्वंकष विचार करून संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे, शासनाच्या व विद्यापीठाच्या अटी व शर्तीस आधीन राहून खालीलप्रमाणे शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-याच्या पद निर्मितीस मान्यता देत आहेत.

अ) अधिव्याख्याता २० पदे मंजूर करण्यात येत असून खालील नेमणूकांना विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेच्या आधीन राहून मान्यता देत आहे.

| अ. क्र. | अधिव्याख्याताचे नांव | वेतन-श्रेणी | वर्गवारी | मान्यता कालावधी | श |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रा. सी. डी. परिहार | रू. २२००-४००० | विमुक्त जाती भटक्या जमाती | सन ९०-९१ पासून | |
| २. | प्रा. ए. बी. खेडेकर | --"-- | इतर मागास-वर्गीय | ९०-९१ पासून | |
| ३. | प्रा. एस. एम. साकुरे | --"-- | इ. मा. व. | सन ९०-९१ पासून | |
| ४. | प्रा. के. एम. मालोदे | --"-- | इ. मा. व. | सन ९१-९२ पासून | |
| ५. | प्रा. कु. के. टी. कापसे | --"--- | इ. मा. व. | सन ९०-९१ पासून | |
| ६. | प्रा. कु. एम. बी. जाधव | --"-- | खुला | सन ९१-९२ पासून पुढे | |

| अ.क्र. अधिव्याख्यात्याचे नांव | वेतन श्रेणी | वर्गवारी | मान्यता कालावधी |
|---|---|---|---|
| ७. प्रा. श्री. एस. के. निंबाळकर | रु.२२००-४००० | खुला | सन ९६-९७ पासून पुढे |
| ८. प्रा. कु. एस. एम. लाडे | --"-- | अनु.जाती | --"-- |
| ९. प्रा. कु. के. एस. कवाडे | --"-- | अनु.जाती | --"-- |
| १०. प्रा. ए. टी. गोपालपुरे | --"-- | अनु.जमाती | --"-- |

वर मंजूर करण्यात आलेल्या अधिव्याख्यातांनी नियमानुसार अधिव्याख्याता पदाची आवश्यक असणारी अर्हता नेट/सेट परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर अर्हता धारण करेपर्यंत त्यांच्या नेमणुका तात्पुरत्या स्वरुपात राहतील त्यांना नियमानुसार वेतन वाढी मिळणार नाही.

अधिव्याख्याता संवर्गामध्ये अनु.जमातीचा अनुशेष असल्याकारणाने प्रा. वाकडे यांच्या नेमणुकीस मान्यता देता येत नाही. सदर अनुशेष पुर्ण केल्या नंतरच त्यास मान्यता देण्याचा विचार केला जाईल.

प्रा. टिकले यांची नेमणूक अर्धवेळ शिक्षक आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवुन दिलेल्या आकृती बंध रचने मध्ये अर्धवेळ शिक्षकाचे पद नसल्याने त्यास मान्यता देता येत नाही.

उर्वरीत मंजूर नऊ पदे विद्यापीठाकडून जाहीरात मसुदा मान्य करुन घेऊन मागासवर्ग आरक्षणानुसार व अनुशेषानुसार भरण्यात यावीत. सदर पदे भरतांना शासनाने व विद्यापीठाने विहीत केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

पदे भरतांना मुलाखतीसाठी विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांना या संचालनालयाचे प्रतिनिधी म्हणून मुलाखतीसाठी बोलावण्यात यावे.

केलेल्या नेमणुकीस संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मान्यता घेण्यात यावी. आरक्षणासाठी असलेली पदे त्यानुसार भरणेच आवश्यक आहे. त्या व्यतिरिक्त केल्या जाणा-या नेमणुकीस मान्यता दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) शिक्षकेत्तर कर्मचारी :- विद्यापीठ अनुदान आयोगाने व शासनाने ठरवुन दिलेल्या आकृतीबंध रचनेनुसार सरदार पटेल समाज कार्य विभागास खालील शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पदांना मान्यता देण्यात येत आहे.

१. रजिस्ट्रार - २०००-३५०० = १ पद
२. कार्यालयीन अधीक्षक - १६४०-२९०० = १ पदे
३. लेखापाल - १६४०-२९०० = १ पद
४. लिपीक (टायपिंग क्लार्क/टायपिस्ट) - ९५०-१५०० = २ पदे

| | | | |
|---|---|---|---|
| ५. शिपाई (ग्रंथालयासह) | - | ७५०-९४० | = २ पदे |
| ६. चौकीदार | - | ७५०-९४० | = ३ पदे |
| ७. सफाईगार | - | ७५०-९४० | = २ पदे |
| | | एकूण | १२ पदे |

१. ग्रंथपाल पदास व यु.जी.सी. प्रमाणे वेतन-श्रेणीस शासनाची मान्यता नसल्याने सदर पद मान्य करता येत नाही.

२. वाहन चालक, माळी, वसतिगृह निरीक्षक ही पदे आवश्यकतेनुसार मंजूर करता येतात. त्यामुळे समाज कार्य विभागासाठी सदर पदांच्या आवश्यकते बाबतच्या स्पष्टीकरणाची आवश्यकता आहे. उदा. संस्थेचे समाज कार्य विभागाचे वाहन आहे काय ? समाज कार्य विभागासाठी स्वतंत्र वसतिगृह आहे किंवा कसे असल्यास त्यात प्रवेशित छात्र किती, त्यांना कोणत्या सुखसोई उपलब्ध आहे. तसेच माळी बाबत सुद्धा स्पष्टीकरण आवश्यक आहे. तरी त्याबाबतचे स्पष्टीकरण जिल्हा समाजकल्याण अधिकारी, चंद्रपूर मार्फत सादर करण्यात यावे.

३. ग्रंथालयाची पुस्तक संख्या ५००० ते १०००० असल्याचे नमूद केलेले आहे. निश्चित पुस्तक संख्या तपासणे आवश्यक असल्याने सहाय्यक ग्रंथपालाचे व लिपीकाचे पद मंजूर करता येत नाही.

४. कार्यालय अधीक्षक/लेखापाल/लिपीक संवर्गामध्ये विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाने अनुशेष असल्याचे दर्शविलेले आहे. त्यामुळे सदर पदावर सध्या कार्यरत असणाऱ्यांना मान्यता देता येत नाही. मागासवर्ग आरक्षण अनुशेष (संवर्गनिहाय) पुर्ण करून मान्यतेचा फेर प्रस्ताव सादर करण्यात यावा. अनुशेषा व्यतिरिक्त केल्या जाणाऱ्या नेमणूकीस मान्यता दिली जाणार नाही.

त्याच प्रमाणे वर मंजूर करण्यात आलेली पदे शासनाने विहीत केलेल्या कार्य पध्दतीचा अवलंब करून भरण्यात यावी. मुलाखतीसाठी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, चंद्रपूर यांना या संचालनालयाचे प्रतिनिधी म्हणून मुलाखतीस बोलावण्यात यावे. केलेल्या नेमणूकीस संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मान्यता घेण्यात यावी.

मान्यतेचे प्रस्ताव जिल्हा समाजकल्याण अधिकारी, चंद्रपूर यांचे मार्फतच सादर करण्यात यावे. परस्पर केलेला पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

मा. संचालकांच्या मान्यतेने.

संचालक, समाजकल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

प्रत - विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

- ४ -